# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६९ वी बैठक दिनांक १४ डिसेंबर २०११

## ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ६९ वी बैठक दि. १४ डिसेंबर २०११ रोजी सिंचन भवन, नागपूर येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

१. मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर ... मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष
२. मा. श्री. वल्लभ बेनके ... वि.स.स. व उपाध्यक्ष (मकृखोविम)
३. मा. इं. ए. बा. पाटील ... प्रधान सचिव (जसं) व सदस्य
४. इं. दी. रं. कंदी ... कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

१. श्री. नि. वा. वाडेकर ... प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी

**निमंत्रित अधिकारी**

१. इं. शि. मा. उपासे ... मुख्य अभियंता (जसं), पुणे
२. इं. च. आ. बिराजदार ... मुख्य अभियंता (विप्र), पुणे
३. श्री. अ.स. शिरुडे ... मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम)
४. इं. अविनाश सुर्वे .... अ.अ., पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे
५. इं. खलील हा. अन्सारी ... अ.अ., कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर
६. इं. रा. के. निटूरकर ... अ.अ., कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(इंजि. दीपक रं. कंदी)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६९ वी बैठक दिनांक १४ डिसेंबर २०११

**ठराव**

ठराव क्र. ६९/१

"नियामक मंडळाच्या ६७ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

ठराव क्र. ६९/२

"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ६८ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र. ६९/३

"ठराव करण्यात येतो की, सन २०१०-११ चा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा ताळेबंद व प्रगती लेखा टिप्पणीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६९/४

"ठराव करण्यांत येतो की, सन २०१०-११ च्या पंधराव्या वार्षिक अहवालास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच हा अहवाल शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६९/५

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ मधील कलम १९/२ (एच) अंतर्गतच्या तरतुदीनुसार, शासनाच्या दिनांक १५/७/२००३ रोजीच्या परिपत्रकामधील पाटबंधारे सिंचन प्रकल्पांमधील सार्वजनिक खाजगी सहभागाबद्दल प्रसृत केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ (MEDC) मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यासाठी सदर संस्थेची सर्वकष माहिती अटी व शर्तीसह मा.अध्यक्ष यांना सादर करुन मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६९/६

"ठराव करण्यात येतो की, कुकडी प्रकल्पांतर्गत चिलवडी शाखा कालवा किमी. १६ ते १८ मधील बाधित शेतकरी (एकूण १२) रा. मौजे होलेवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर येथील गट क्र. २६, १५, १९८, १९९, १५१, १५८, १८७/२/१, १९५, १९७, १६६ मधील संपादित क्षेत्र ६.७५ हेक्टर क्षेत्रावरील फळझाडांची नुकसान भरपाई मुल्यांकन रक्कम ₹ १४,०८,१२६/- इतकी अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

**सही/-**
(इंजि. दीपक रं. कंदी)
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६९ वी बैठक दिनांक १४ डिसेंबर २०११

ठराव क्र. ६९/७

'' ठराव करण्यात येतो की, जांबरे मध्यम प्रकल्पांतर्गत धरण पाया व बुडीत क्षेत्राच्या भूसंपादन प्रकरणांचा निवाडा जाहीर होऊनही प्रकल्पाच्या कामास निधी उपलब्ध नसल्यामुळे मोबदला उशिरा वाटप झाल्याने या कालावधीतील मोबदला रकमेवरील १२ टक्के व्याजाने येणारी रक्कम ₹ ५७,९०,८३४ प्रकल्पग्रस्तांना अदा करण्याच्या प्रस्तावास 'खास बाब' म्हणून खालील अटींच्या अधिन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर प्रकल्पाची घळभरणी, पाणीसाठा निर्मिती व सिंचन क्षमता निर्मितीची कामे वर्ष २०११-१२ साठी दिलेल्या उद्दिष्टानुसार पूर्ण करण्यात यावीत.

२. सदर प्रस्तावास 'अपवादात्मक प्रकरण' (Exceptional Case) म्हणून मान्यता देण्यात येत आहे. या प्रकरणाचा भविष्य काळात अन्य प्रकरणांशी उदाहरण म्हणून उपयोग करता येणार नाही.''

ठराव क्र. ६९/८

"ठराव करण्यांत येतो की, हिरण्यकेशी (सर्फनाला) मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या (ता. आजरा जि. कोल्हापूर) बुडित क्षेत्रातील भूसंपादनाच्या मंजूर निवाडा एस.आर.६८/२००० मधील वगळलेल्या फळझाडे, घरे, इतर बांधकामे इ. बाबींची मोबदला रक्कम ₹ ३.७१ कोटी प्रकल्पग्रस्तांना अदा करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६९/९

"ठराव करण्यात येतो की, श्री. ज्ञा.द. शिंदे, वकील, यांची महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे 'कायदे सल्लागार' पदी दिनांक १/९/२०१० ते ३१/८/२०११ पर्यंत नियुक्ती केलेली आहे. सदर नियुक्तीस दिनांक १/९/२०११ ते ३१/८/२०१२ या कालावधीसाठी पूर्वीच्याच अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात येत आहे. इतर महामंडळांत कायदे सल्लागारांना देण्यात येणारे मानधन व भत्ते, त्यांचे कामकाजाचे दिवस या बाबींसह मा.अध्यक्ष यांचेबरोबर चर्चा करुन श्री.शिंदे यांचे मानधन निश्चित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

"मान्य"

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| (इंजि. दीपक रं. कंदी) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |